I.O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** शिवुर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0436 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/11/2025 04:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 19/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/11/2025
**Time From (वेळेपासून):** 17:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/11/2025 **Time (वेळ):** 03:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/11/2025 03:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शिऊर बंगला ,वैजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): योगेश भास्कर शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गारखेडा ,छत्रपती संभांजीनगर ,शिवुर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | गारखेडा ,छत्रपती संभांजीनगर ,शिवुर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9403865681

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नवनाथ मच्छिंद्र कोकाटे | | | 1. पिंपळगाव खंडाळा ,वैजापुर , शिवुर,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची 10,000/ रुपये भारतीय | 10,000.00 |



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): योगेश भास्कर शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गारखेडा ,छत्रपती संभांजीनगर ,शिवुर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | गारखेडा ,छत्रपती संभांजीनगर ,शिवुर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9403865681

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नवनाथ मच्छिंद्र कोकाटे | | | 1. पिंपळगाव खंडाळा ,वैजापुर , शिवुर,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची 10,000/ रुपये भारतीय | 10,000.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | चलानाच्या पाचशे रुपये दराच्या विस नोटा एकुण 10,000/ रुपये | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 20/11/2025

मी योगेश भास्कर शिंदे वय 36 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर रा. गारखेडा, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9403865681
मी दिनांक 19/11/2025 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन सांगितले की, तक्रारदार नामे किरण भागीनाथ पवार वय 33 वर्षे व्यावसाय शेती रा. सावखेड खंडाळा ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी फोनव्दारे कळविले की, त्यांचेकडे शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी होत आहे तरी आपण सोबत शासकीय पंच घेवुन जावुन तक्रारदाराची भेट घेवुन त्यांचे शासकीय काम करुन देण्यासाठी लाचमागणी होत आहे काय याची खात्री करुन कारवाई करावी, अशा तोंडी सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेवुन आम्ही व सोबत सापळा पथक असे तक्रारदार याची भेट घेण्यासाठी शासकिय वाहनाने रवाना होवुन तक्रारदार याचे सांगण्यावरुन त्यांची आम्ही गारज ता. वैजापुर येथील सुरक्षीत ठिकाणी भेट घेवुन पंचासमक्ष तक्रारदार यांना भेटुन त्यांचे शासकिय कामाचे कागदपत्रे पाहुन त्याचेशी चर्चा केली. तसेच मी तक्रारदार श्री किरण पवार यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांना विचारल्यावरुन त्यांनी त्यांची तक्रार लेखी लिहुन दिली. ती पुढील प्रमाणे.

मी किरण भागीनाथ पवार रा. सावखेड खंडाळा ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर असा असुन माझे वडील कै.भागीनाथ कडुबा पवार हे दि.29/06/2023 रोजी मारहाणीमध्ये त्यांना ॲटक आल्याने मयत झाले असुन त्याबाबत त्यांचे मृत्यु संदर्भात योग्य ती चौकशी न केल्याने मी दि.31/10/2025 रोजी मी पोस्टाने पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, शिऊर पोलीस स्टेशन व पोलीस अधिक्षक, छत्रपती संभाजीनगर यांना तक्रार अर्ज पाठविला होता. तसेच सदर तक्रार अर्जातील गैरअर्जदार यांनी मला फोन वरुन शिवीगाळ करुन खोटा ॲट्रोसिटीचा गुन्हा नोंद करण्याची धमकी दिली म्हणुन मी पुन्हा दि. 11/11/2025 रोजी त्यासंदर्भातील तक्रार अर्ज प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन शिऊर यांना पोस्टाने पाठविला होता. त्यानंतर दि. 12/11/2025 रोजी पोलीस स्टेशन शिऊर येथे होमगार्डचे काम करत असलेला नवनाथ कोकाटे याने फोनव्दारे संपर्क करुन वाकला बिट चे बिट अंमलदार थोरात साहेबांना तुमचे तक्रार अर्ज मिळालेले आहेत. तक्रार अर्जाचे चौकशीसाठी त्यांना पैसे दयावे लागतील त्यानंतर तुझे काम होईल असे मला त्याने सांगीतले. त्यानंतर दि.17/11/2025 रोजी नवनाथ कोकाटे हा मला तहसिल कार्यालय, वैजापुर येथे भेटुन म्हणाला की, थोरात साहेबांशी चर्चा झाली आहे, त्यांनी तक्रार अर्जाची चौकशी तुझ्या बाजुने करण्यासाठी मला 20,000/- रुपये लागतील असे सांगीतले आहे. कोकाटे असे म्हणाल्यानंतर मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी आज दि.19/11/2025 रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क करुन लाचेसंदर्भात तक्रार असल्याचे सांगीतले. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री शिंदे व पथक यांनी माझी मौजे गारज येथे सुरक्षीत ठिकाणी समक्ष भेट घेवुन माझेकडील कागदपत्रांची पाहणी करुन माझे तक्रारीसंदर्भात चर्चा केली आहे.

तरी मी आज रोजी पोलीस स्टेशन शिऊर येथे दिलेल्या तक्रार अर्जाचे चौकशी संदर्भात माझ्या बाजुने चौकशी करुन मदत करण्यासाठी नवनाथ कोकाटे यांची ते सांगतील त्या ठिकाणी भेट घेणार आहे. त्यांची भेट घेवुन



Scanned with OKEN Scanner

कामासंदर्भात चर्चा करणार आहे. तसेच त्याचे मार्फतीने बिट अंमलदार थोरात साहेबांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यावेळी माझ्याकडे नवनाथ कोकाटे याने तसेच बिट अंमलदार थोरात साहेबांनी किंवा त्यांचे वतीने इतर कोणी पैशाची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी.

माझ्यात व नवनाथ कोकाटे यांचेत कोणताही आर्थीक व्यवहार अगर उसनवारी नाही. तसेच त्यांचेत व माझ्यात कोणतीही वैर दुश्मनी नाही. वगैरे लेखी तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यानंतर तक्रारदार श्री किरण पवार यांची लेखी तक्रार माझ्यासह पंचांनी वाचुन त्यावर सहया केल्या.

त्यावेळी तक्रारदार श्री. किरण पवार यांनी ते नवनाथ कोकाटे, होमगार्ड रा. पिंपळगाव खंडाळा ता वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांना दि. 19/11/2025 रोजी त्यांचे प्रलंबित कामासंदर्भात भेटण्यासाठी ते बोलावतील त्या ठिकाणी जाणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी सर्वांना तक्रारीची पडताळणी करणार आहोत असे सांगीतले. तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार श्री. किरण पवार व पंच क्रं.1 शेलार यांचेसह नवनाथ कोकाटे यांनी बोलावलेल्या ठिकाणी पाठवुन तक्रारीप्रमाणे श्री. कोकाटे हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, त्यामध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार किरण पवार व पंचांची खात्री करुन दिली. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु बंद करण्याचे प्रात्याक्षीक दाखवले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 17.31 वा.चालु करुन, तो तक्रारदार श्री. पवार यांचे गळ्यात दोऱ्याचे सहाय्याने अडकवुन तक्रारदार व पंच नं. 01 यांना नवनाथ कोकाटे, होमगार्ड हे सांगतील त्याठिकाणी त्यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलवर बसवुन पाठविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 असे नवनाथ कोकाटे याची कामासंदर्भात भेट घेवुन पुन्हा आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 18.10 वाजता बंद केला.

आम्ही प्रथम पंच क्रं. 1 यांना नवनाथ कोकाटे, होमगार्ड यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार किरण पवार असे सोबत निघुन तक्रारदार याने नवनाथ कोकाटे यास फोनवरुन करुन सपर्क शिऊर फाटा येथे गेलो. तेथे तक्रारदार व नवनाथ कोकाटे यांचेत कामासंदर्भात चर्चा झाली. तसेच तक्रारदार याने बिट अंमलदार थोरात यांना फोन करण्यास सांगीतले असता नवनाथ कोकाटे याने फोन करुन अर्ज पाठवल्याचे सांगीतले. त्यानंतर त्यांचेत कामाबाबत चर्चा होवुन अर्जदाराचे शिऊर पोलीस स्टेशन येथे दिलेले तक्रार अर्जामध्ये तक्रारदाराचे बाजुने चौकशी करुन मदत करुन देण्यासाठी 20,000/- रुपये लाचमागणी करुन स्विकारण्याचे कबुल केले. त्यांनतर त्यांनी तक्रारदारास लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितले असता तक्रारदाराने त्यास होकार देवुन आम्ही माघारी निघुन आलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. किरण पवार यांच्याकडे घडलेल्या घटनेबाबत चौकशी केली असता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांचे प्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकार्डर चालु करुन त्यामधील तक्रारदार आणि नवनाथ कोकाटे यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता " काय करायंच तर करा ना म्हणा, त्यांच्याकडे अर्ज पोहोचलेला आहे., हां.. काये म्हणंल हे.., हां.. फक्त बोलुन घ्यायंच आहे त्यांनला आणि , त्यांचा अर्ज आहे ना.. बगतो मी.. बर अंन सांगतो मंग.., हाव ठिक आहे., त्यांच्याकडपण अर्ज आलेले आहे. एवढ विश्वासाने काम करतो आं तुमचं.., काय आता आपल्याला काय कळत नाही त्यात..म्या तुले सांगेल आकडा होएल है का आता.., आकडा तुला एक पंधरा-विस मिनटात, लगेच दहा देतो तुला मी.., एकखट्टी देवुन टाक तिनदा-तिनदा उजुक मंग कस राहत ते , ते ते बरोबर करुन घेतात ते थोरात साहेब.., लगेच कर मंग मला घरी जायंच आहे.., "असे झाल्याचे ऐकु आले. सदर संभाषणातुन नवनाथ कोकाटे याने तक्रारदाराकडे त्याचे पोलीस स्टेशन शिऊर येथे दिलेल्या तक्रारी अर्जामध्ये तक्रारदाराचे बाजुने चौकशी करुन मदत करुन देण्यासाठी 20,000/- रुपये लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे कबुल केल्याचे निष्पन्न झाले. आम्ही तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे व नवनाथ कोकाटे यांनी केलेल्या लाचमागणीच्या अनुषंगाने सापळा कारवाई सुरु केली.

त्यानंतर तक्रारदार किरण पवार यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोट असे एकुण 10,000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. उर्वरीत रकमेबाबत विचारता त्यांनी पैसे नसल्याचे सांगीतले. त्यानंतर मी तक्रारदार किरण पवार व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 10,000/- रुपये तक्रारदार किरण पवार यांचे शर्टचे डाव्या बाजुचे छातीवरील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास, सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, तक्रारदार यास नवनाथ कोकाटे यांनी लाच



Scanned with OKEN Scanner

रक्कम स्विकारल्यानंतर त्यांनी त्यांचे डोक्यावरील कॅप काढण्याचा इशारा करण्याची सुचना दिली. त्यानंतर पंचासमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 18.55 वा चालु करुन तो तक्रारदार किरण पवार यांचे गळ्यात अडकवुन तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी त्यांचेकडील मोटार सायकलवरुन नवनाथ कोकाटे यांची भेट घेण्यासाठी फोनवरुन संपर्क करुन बोलल्याप्रमाणे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील शासकिय वाहनाने शिऊर बंगला ते नांदगाव रोडवरील जिनींग मिलजवळ आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे जिनींग मिलसमोर नवनाथ कोकाटेंची भेट घेवुन काहीवेळाने तक्रारदार याने जिनींग मिलचे गेट बाहेर येवुन डोक्यावरील कॅप काढल्याचा लाच स्विकृतीचा 19.19 वा. पुर्व नियोजीत ईशारा करीत असल्याचे पाहिले. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन सापळा पथकातील पोलीस निरीक्षक तिगोटे यांनी तक्रारदाराचे दिशेने जात असताना नवनाथ कोकाटे यास संशय आल्याने त्याने तक्रारदाराकडुन हातात घेतलेली लाचेची रक्कम तक्रारदाराचे दिशेने फेकुन दिली व गोंधळ करुन आरडाओरडा करु लागला. तेव्हा आमचे सुचनेवरुन पंच क्रं. 1 यांनी कोकाटे यांनी हातात घेवुन खाली फेकलेली लाचेची रक्कम ताब्यात घेतली तसेच कोकाटे यास लागलीच ताब्यात घेवुन तक्रारदाराचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर बंद केले.

आम्ही पंचासमक्ष ताब्यात असलेल्या इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव नवनाथ मच्छिंद्र कोकाटे, वय-30 वर्षे, व्यवसाय शेती, रा. पिंपळगाव खंडाळा, ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रककम स्वत:चे हातात स्विकारुन पुन्हा का फेकली याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मला तक्रारदारावर संशय आल्याने मी तक्रारदार किरण पवार याचे शिऊर पोलीस स्टेशन येथे दिलेले तक्रार अर्जामध्ये त्यांचे बाजुने चौकशी करुन मदत करुन देण्यासाठी बिट अंमलदार थोरात यांचे नाव सांगुन रुपये 10,000/- रु. लाचेची रक्कम उजव्या हाताने तक्रारदार यांचेकडुन घेवुन हातात ठेवली असता मला पंचाचा संशय आल्याने व सापळा पथक जवळ येत असल्याचे दिसल्याने मी माझ्या हातात घेतलेली लाचेची रक्कम तक्रारदार यांचे दिशेने फेकुन देवुन पळुन जाण्याचा प्रयत्न करत होतो. तेव्हा सदरची लाचेची रक्कम पंच क्रं.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याने दिलेल्या नोटांशी खात्री करता ती तीच असल्याचे दिसुन आले. (प्रथम खबर मजकुराची श्ब्द मर्यादा असल्याने उर्वरीत फिर्याद सोबत जोडलेली आहे.)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vaibhav Ashok Rankhamb(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(योगेश शिंदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vaibhav Ashok Rank
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

ठाणे अमलदार
पोलिस ठाणे, शिवूर
छत्रपती संभाजीनगर (ग्रा.)



Scanned with OKEN Scanner

तसेच पंचासमक्ष अल्ट्रा व्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात नवनाथ कोकाटे यांचे हात व हातात घेतलेली लाच रक्कम कृत्रीम अंधार करुन तपासले असता नवनाथ कोकाटे याचे उजव्या हातावर व लाच रकमेवर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच पंच क्रं. 1 याने खाली पडलेली लाचेची रक्कम उचलेली असल्याने त्याचे हात अल्ट्रा व्हायलेट प्रकाशाचे उजेडात तपासले असता त्याचे हातावर देखील खाली पडलेली लाचेची रक्कम उचलल्यामुळे हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं.2 यांचेसमक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार असे नवनाथ कोकाटे यास फोनवरुन संपर्क केल्यानुसार ठरलेल्या ठिकाणी जिनींग मिल, नांदगाव रोड शिऊर बंगला या ठिकाणी मिलचे गेटजवळ येवुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने नवनाथ कोकाटे हा आमचे जवळ येवुन त्यांचेत व तक्रारदार यांचेमध्ये चर्चा चालु असताना नवनाथ कोकाटे यास माझ्यावर संशय आल्याने त्यांनी माझी विचारपुस करुन बाजुला थांबण्यास सांगीतले. त्यावेळी मी तक्रारदाराचे थोडा बाजुला जावुन थांबलो. तसेच ठरलेली लाचेची रक्कम कमी असल्यामुळे त्यांचेत चर्चा चालु होती. त्यानंतर तक्रारदार याने त्याचेकडील लाचेची रक्कम 10,000/- रुपये नवनाथ कोकाटे याचेकडे दिल्यानंतर तक्रारदार याने बिट अंमलदार थोरात यांना फोन करण्यास सांगीतले. तेव्हा नवनाथ कोकाटे याने थोरात पोलीस यांना फोन लावण्यास नकार दिला. त्यानंतर तक्रारदाराने लाचेची रक्कम मोजुन घेण्यास सांगुन डोक्यावरील कॅप काढुन नियोजीत इशारा केला. त्यानंतर पोनि तिगोटे साहेब जवळ येताच कोकाटे याला संशय आल्याने त्याने हातात घेतलेली लाचेची रक्कम तक्रारदाराचे दिशेने फेकुन त्याने आणलेल्या गाडीकडे पळुन जाण्याचा प्रयत्न करुन गोंधळ करुन आरडाओरडा सुरु केला. त्यानंतर तुम्ही त्यास ताब्यात घेतले तेव्हा मी तुमचे सुचनेवरुन खाली पडलेली लाचेची रक्कम स्वत:चे हातात उचलली असे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेर्काडर चालु करुन त्यामधील कैद तक्रारदार किरण पवार व नवनाथ कोकाटे यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता " **हे काय जिनिंगमधी, इकडे ये ना रोडच्या बाजुला, धर हे घे.., कही व्हायच त नही ना , किती हे हे.., दहा बाकीचे सकाळी देतो, निघले नही ना ते, तु त म्हणने पंधरा करतो म्हणे, महयावर काही आफत नको आणु म्हट ल, फोन लावाची गरज नही, दहा दिले ना मोजुन घे, असीन नां.., मोजुन घे, मोजुन घे न, मोजुन घे एक बार "असे** झालेल्या संभाषणामध्ये लाचमागणी पैकी

Scanned with OKEN Scanner

रुपये 10,000/- रक्कम उजव्या हातात स्विकारुन सापळा पथकाचा संशय आल्याने सदरची लाच रक्कम तक्रारदाराचे दिशेने फेकली आहे या वरुन नवनाथ कोकाटे यांनी तक्रारदार यांचे पोलीस स्टेशन शिऊर येथील बिट अंमलदार थोरात यांचेकडे चौकशीवर प्रलंबित असलेले तक्रार अर्जात तक्रारदाराचे बाजुने मदत करण्यासाठी तक्रारदाराकडे 10,000/- रुपये लाच रक्कम स्वत:चे हाताने स्विकारुन सापळा पथकाचा संशय आल्याने ती तक्रारदाराचे दिशेने फेकुन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सदरची लाचेची रक्कम, नवनाथ कोकाटे यांचे अंगझडतीत मिळुन आलेला मोबाईल पंचासमक्ष ताब्यात घेवुन जप्त केले. तसेच खाजगी इसम नवनाथ कोकाटे यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाईकामी शिऊर पोलीस स्टेशन येथे येवुन पंचनामा करुन कारवाई पुर्ण केली आहे.

तरी दि. 19/11/2025 रोजी 17.31 वा ते 19.19 वा दरम्यान नांदगाव- शिऊर बंगला रोडवरील जिनींग कापुस मिलजवळ, ता वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर याठिकाणी यातील मुळ तक्रारदार किरण भागीनाथ पवार वय 33 वर्षे व्यावसाय शेती रा. सावखेड खंडाळा ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी शिऊर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रार अर्जामध्ये त्यांचे बाजुने चौकशी करुन मदत करुन देण्यासाठी खाजगी इसम नवनाथ मच्छिंद्र कोकाटे, वय-30 वर्षे, व्यवसाय शेती, रा. पिंपळगाव खंडाळा, ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी शिऊर पोलीस स्टेशनचे वाकला बिट अंमलदार श्री थोरात यांचे नावाचा प्रभाव पाडुन स्वत:करीता तक्रारदार यांचेकडे 20,000/- रु. लाचमागणी करुन स्विकारण्याचे कबुल केले. परंतु तक्रारदार याचेकडे लाचमागणीची पुर्ण रक्कम देण्यास उपलब्ध नसल्याने लाचमागणी पैकी 10,000/- लाचेची रक्कम तक्रारदार याचेकडुन स्वत: स्विकारताना रंगेहात मिळुन आले म्हणुन खाजगी इसम नवनाथ कोकाटे यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7(अ) प्रमाणे सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

समक्ष

(योगेश शिंदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner